बुधवार दि. ०८ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यात स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; ₹११.३५ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त, एक आरोपी जेरबंद

### नाव्हा चौफुली येथे सापळा रचून कारवाई; पान मसाला, जर्दा व लोडिंग वाहन जप्त

**जालना । प्रतिनिधी**

मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या प्रतिबंधित गुटख्याच्या अवैध वाहतूक व विक्रीविरोधात जालना स्थानिक गुन्हे शाखेने सोमवारी (७ जुलै) मोठी कारवाई करत ₹११ लाख ३५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला अटक केली आहे. या कारवाईत प्रतिबंधित पान मसाला, जर्दा तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले लोडिंग वाहन जप्त करण्यात आले आहे. जिल्ह्यात अवैध गुटखा विक्री व वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना गुटखा तस्करांची माहिती गोळा करून प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर ७ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नाव्हा येथून जालना शहराकडे एका लोडिंग वाहनातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आणला जात आहे. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी नाव्हा चौफुली येथे सापळा



रचला. माहितीनुसार संशयित लोडिंग वाहन (क्र. -२१--७४००) थांबवून चालकाची चौकशी करण्यात आली. त्याने आपले नाव महेबूब खाजा शेख (वय ३१), रा. आक्सा मशिदीजवळ, बालाजी नगर, जालना असे सांगितले.

यानंतर वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला राजनिवास सुगंधित पान मसाला आणि केएन-०१ जाफराणी जर्दा असा ₹८ लाख ८५ हजार ६०० रुपयांचा माल आढळून आला.

तसेच ₹२ लाख ५० हजार किमतीचे लोडिंग वाहन जप्त करण्यात आले.

अशा प्रकारे एकूण ₹११ लाख ३५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

या प्रकरणी आरोपी महेबूब खाजा शेख याच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रतिबंधित गुटख्याचा साठा कुठून आणण्यात आला होता,

तो कोणाकडे पोहोचविण्यात येणार होता आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच कर्मचारी रमेश राठोड, प्रभाकर वाघ, इर्शाद पटेल, सतीश श्रीवास, सोपान क्षीरसागर आणि चालक अशोक जाधव यांनी संयुक्तपणे पार पाडली.

## स्थानिक आमदारांचा श्रेय लाटण्याचा प्रयत्न हास्यास्पद असल्याचा गोरंटयाल यांचा टोला

### रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार जालना मर्चंटला मिळाले ९३ कोटी ३६ लाख

**जालना - प्रतिनीधी**

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार इन्श्युरंस कंपनीने अडचणीत असलेल्या जालना मर्चंट बँकेला ९३ कोटी ३६ लाख रुपये उपलब्ध करून दिले आहेत. मात्र, याचेही श्रेय लाटण्याचा हास्यास्पद प्रयत्न विद्यमान आमदारांनी केला असल्याचा टोला जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी लगावला आहे.

जालन्यातील जालना मर्चंट सहकारी बँकेत मध्यंतरी कोट्यावधी रुपयांचा घोटाळा उघडकीस आल्यानंतर शेकडो ठेवीदारांमध्ये मोठी खळबळ उडाली असून अनेक खातेदारांच्या लाखो रुपयांच्या ठेवी अडकून पडल्यामुळे संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

या घोटाळा प्रकरणी पोलिसात देखील गुन्हे दाखल करण्यात आले असून या सर्व बाबींची तातडीने दखल घेत रिझर्व्ह बँकेने जालना मर्चंट बँकेतील सर्व प्रकारच्या व्यवहारांवर निर्बंध घातले आहेत. ठेवीदार आणि खातेदारांच्या संतप्त भावना लक्षात घेऊन पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी असणाऱ्यांना विम्याच्या माध्यमातून त्यांची रक्कम दि. ५ जुलै २०२६ नंतर परत



करण्यात येईल असे रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार जालना मर्चंट बँकेच्या व्यवस्थापनाने यापूर्वीच स्पष्ट केलेले आहे. या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी .

जालना मर्चंट बँकेच्या व्यवस्थापनाने सुमारे १०५ कोटी रुपये इतकी रक्कम उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे पाठवला होता. या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने रिझर्व्ह बँकेने ५ लाख रुपयांपर्यंत ठेवी असणाऱ्या ग्राहकांना विम्याच्या माध्यमातून त्यांची रक्कम परत करण्यासाठी ९३ कोटी ३६ लाख रुपये अदा करण्याचे निर्देश डीआयसीजीसी या इन्श्युरंस कंपनीला दिले आहेत. मिळालेली रक्कम ही इन्श्युरंस कंपनीने उपलब्ध करून दिली असतांना जालन्याच्या स्थानिक आमदारांनी जालना मर्चंट बँकेला आपणच उपरोक्त रक्कम उपलब्ध करून दिल्याचा हास्यास्पद आणि केविलवाणा प्रयत्न केल्याचा टोला माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी लगावला आहे. रिझर्व्ह बँकेने या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घातले असून ९३ कोटी ३६ लाख रुपयांची रक्कम उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उर्वरित रक्कम देखील संबंधित इन्श्युरंस कंपनीकडून लवकरच मिळणार असल्याने खातेदारांसह ठेवीदारांची देखील सर्व रक्कम परत करण्याचा प्रयत्न जालना मर्चंट बँकेच्या व्यवस्थापनाकडून केला जात असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले आहे. रिझर्व्ह बँकेने दखल घेतल्यामुळे ठेवीदारांसह सर्व खातेदारांची संपूर्ण रक्कम निश्चितपणे परत मिळेल, कुणीही चिंता करू नये असे आवाहनही माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केले आहे.

## आषाढी वारीच्या इतिहासात पहिल्यांदाच सिंदखेडराजा ते पंढरपूर ‘‘वारी विवेकाची‘‘!

### अभिनय उपक्रम, जालना जिल्ह्यात दोन मुक्काम

**जालना - प्रतिनिधी**

: मातृतीर्थ सिंदखेडराजा ते तीर्थक्षेत्र पंढरपूर पर्यंत यंदा प्रथमच ‘‘वारी विवेकाची‘‘ निघणार आहे. १० जुलै ते १९ जुलै असा वारीचा प्रवास राहणार आहे. प्रवचन, कीर्तनातून या वारीद्वारे ठिकठिकाणी प्रबोधन केले जाणार आहे.

दिनांक १० जुलै शुक्रवार रोजी सिंदखेडराजा येथून विवेकाच्या वारीचे प्रस्थान होणार आहे. यानिमित्त आयोजित सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून कृषीभूषण विजयअण्णा बोराडे, संत चोखामेळा अभ्यासक प्रा. कमलेश खिल्लारे उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष (सिंदखेडराजा) सौरभ तायडे हे असतील. यावेळी माजी सनदी अधिकारी, साहित्यिक श्रीकांत देशमुख, गाथा परिवाराचे संस्थापक तथा संत साहित्याचे अभ्यासक उल्हास पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. राजमाता जिजाऊंना सप्त भगिनींकडून अभिवादन झाल्यानंतर वारीचे प्रस्थान होईल. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन हभप ज्योतीताई जाधव, शिवाजीराव जाधव, विनोद ठाकरे, अण्णा सावंत आदींनी केले आहे.

**जालन्यात दोन मुक्काम**

सजविलेल्या पालखीसह टाळ मृदुंगाच्या गजरात प्रवचन, कीर्तन, गावफेरी करीत ही विवेकाची वारी प्रबोधन आणि लोकजागर करीत निघणार आहे. सिंदखेडराजा येथून निघाल्यानंतर सकाळी दहा वाजता नाव्हा गावात फेरी झाल्यानंतर श्री. मस्के यांच्या महाविद्यालयात प्रवचन कार्यक्रम होणार आहे. दुपारी बारा वाजता कडवंची येथे विसावा. त्यानंतर माळाचा गणपती, प्रशांतिनगर मार्गे खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्र येथे पाच वाजता दिंडीचे आगमन होईल. सहा वाजता या ठिकाणी ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले यांचे प्रबोधनपर व्याख्यान होईल. रात्री आठ वाजता हभप उल्हासदादा पाटील महाराज यांचे कीर्तन आणि *(पान २ वर)*

## जालना मुख्य टपाल कार्यालयाच्या तत्परतेमुळे ५८ वर्षीय व्यक्तीला मिळाले जीवदान

**दत्ता देशमुख**

जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ असलेल्या मुख्य टपाल कार्यालयात दी. ०७ जुले मंगलवार रोजी मानवतेचा आणि कर्तव्यदक्षतेचा प्रेरणादायी अनुभव पाहायला मिळाला. आवर्ती ठेव (आरडी) खात्यात रक्कम जमा करण्यासाठी आलेल्या सुमारे ५८ वर्षीय व्यक्तीची अचानक प्रकृती बिघडली आणि ते कार्यालयाच्या आवारातच बेशुद्ध होऊन कोसळले.

घटनेनंतर त्यांच्या एका नातेवाईकाने रुग्णवाहिका अथवा ऑटो रिक्षाची व्यवस्था करण्यासाठी धाव घेतली. मात्र परिस्थितीची गंभीरता ओळखून जालना मुख्य टपाल कार्यालयातील मल्टी टास्किंग स्टाफ () श्री. निलेश शिळारकर यांनी क्षणाचाही विलंब न करता धाडसी निर्णय घेतला.

बेशुद्धावस्थेतील व्यक्तीची हृदयक्रिया सुरू राहावी यासाठी त्यांनी सतत छातीवर दाब () देत त्यांना तातडीने जालना क्रिटिकल केअर हॉस्पिटलमध्ये पोहोचविले. वेळेत मिळालेल्या या प्राथमिक उपचारांमुळे आणि तत्पर वैद्यकीय सेवेमुळे संबंधित व्यक्तीचा जीव वाचला असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे आणि ते धोक्याबाहेर असल्याची माहिती मिळाली आहे.

या प्रसंगी श्री. निलेश शिळारकर यांनी दाखविलेली प्रसंगावधानता, धैर्य आणि सामाजिक बांधिलकी यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. योग्य वेळी घेतलेला निर्णय आणि सीपीआरसारख्या जीवनरक्षक प्राथमिक उपचारांचे महत्त्व या घटनेतून *(पान २ वर)*

## जालना जिल्हा प्रशासन आणि ग्लोबल विकास ट्रस्टचा सामंजस्य करार; तीन हजार शेतकऱ्यांना आर्थिक, तांत्रिक व प्रशिक्षणाचे सर्वंकष सहाय्य

**जालना -प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी आणि शाश्वत कृषी विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून जालना जिल्हा प्रशासन आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्यात सामंजस्य करार () करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत जिल्ह्यातील ३ हजार शेतकऱ्यांना रेशीम शेतीसाठी आर्थिक, तांत्रिक आणि प्रशिक्षणाचे सर्वंकष सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून, आधुनिक शेतीच्या माध्यमातून ग्रामीण



अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत निवड झालेल्या गावांतील शेतकऱ्यांना च्या माध्यमातून आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्याचबरोबर ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण, अत्याधुनिक तांत्रिक मार्गदर्शन, प्रात्यक्षिके आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहनपर सहाय्य दिले जाणार आहे. त्यामुळे रेशीम शेतीकडे पाहण्याचा शेतकऱ्यांचा दृष्टिकोन बदलून ती एक सक्षम ग्रामीण उद्योगव्यवस्था म्हणून विकसित होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

या उपक्रमात जिल्हा प्रशासनाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची असणार आहे. रेशीम उद्योजक शेतकऱ्यांना पूर्वसंमती, अंदाजपत्रक तयार करणे, अनुदानासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही, प्रशिक्षण आणि विविध शासकीय प्रक्रियांचे मार्गदर्शन प्रशासनामार्फत केले जाणार असून, संपूर्ण उपक्रमावर *(पान २ वर)*

## अंतरवाली सराटी येथे जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्काम दौरा

## जलसंवर्धन, ग्रामविकास व विशेष सखोल पुनरीक्षणावर भर







**जालना - प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी ०६ जुलै रोजी मौजे महाकाळा येथे मुक्काम करून मंगळवारी (दि.७) सकाळी अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी गावाला भेट देत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. यावेळी जलसंवर्धन, ग्रामविकास, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच विशेष सखोल पुनरीक्षण () अभियानाचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

गावभेटी दरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी ग्रामपंचायत कार्यालयात नागरिक, महिला बचत गटांच्या सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. विविध विषयांवर चर्चा करताना त्यांनी भविष्यात उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांनी पाणी संवर्धनासाठी गावात सप्तसूत्री अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना ग्रामपंचायत व ग्रामस्थांना दिल्या. तसेच भूजल पातळी वाढविण्यासाठी *(पान २ वर)*

### यदलापूरच्या शेतकऱ्यांच्या समृद्धी महामार्ग नुकसान भरपाई प्रश्नावर आमदार बबनराव लोणीकर यांचा पुढाकार, MSRDC संचालकांशी दूरध्वनीवरून चर्चा

## मूल्यांकनातील त्रुटींची तपासणी करून न्याय देण्याची मागणी

**परतूर । प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या यदलापूर (ता. परतूर) येथील शेतजमिनींच्या नुकसान भरपाईच्या मूल्यांकनात झालेल्या कथित तांत्रिक त्रुटींमुळे अनेक शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याची बाब पुढे आली असून, या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने पुढाकार घेतला आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून त्यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ () चे संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करत संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली आणि शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी आवश्यक ती



कार्यवाही करण्याची मागणी केली. यदलापूर गावातील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ उपसभापती संभाजी वारे यांच्या नेतृत्वाखाली आमदार लोणीकर यांची भेट घेण्यासाठी आले होते. यावेळी शिष्टमंडळाने समृद्धी महामार्गासाठी संपादित झालेल्या जमिनींच्या मूल्यांकन प्रक्रियेत अनेक तांत्रिक त्रुटी झाल्याचा आरोप केला. चुकीच्या पद्धतीने करण्यात आलेल्या मूल्यांकनामुळे जमिनींचे योग्य बाजारमूल्य निश्चित झाले नसून, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना अपेक्षेपेक्षा कमी नुकसानभरपाई मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी आमदारांच्या निदर्शनास आणून दिले.

शेतकऱ्यांनी सांगितले की, नुकसानभरपाईची रक्कम न्याय्य नसल्याने गावातील अनेक शेतकऱ्यांनी अद्याप ती स्वीकारलेली नाही. योग्य फेरमूल्यांकन करून बाजारभावानुसार नुकसान भरपाई मिळावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. या संदर्भात अनेक वेळा पाठपुरावा करूनही अद्याप समाधानकारक *(पान २ वर)*

# संपादकीय....

## पावसाने उघड केली व्यवस्थेची पोलखोल

पावसाळा हा कोणत्याही शहराच्या नागरी व्यवस्थेची खरी परीक्षा असतो. उन्हाळ्यात कागदोपत्री पूर्ण झालेली कामे, बैठकीतील दावे, कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या घोषणा आणि प्रशासनाची तयारी यांचे वास्तव पहिल्याच मुसळधार पावसानंतर समोर येते. जालना शहरातही यंदा नेमके तेच चित्र दिसून आले आहे. विरोधी पक्षनेते कमलेश खरे व शिवसेनेच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्तांकडे दिलेल्या निवेदनातून अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या आरोपांचे सत्य-असत्य प्रशासनाच्या चौकशीतून स्पष्ट होईल; मात्र या निमित्ताने जालना शहराच्या नागरी व्यवस्थेचा व्यापक आढावा घेण्याची गरज नक्कीच निर्माण झाली आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, रस्त्यांची दुरुस्ती, गटारांची स्वच्छता आणि पावसाचे पाणी न साचण्यासाठी विविध उपाययोजनांवर मोठा खर्च झाल्याचे सांगितले जाते. परंतु पहिल्याच पावसात अनेक भाग जलमय होत असतील, नाले तुंबत असतील आणि रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होत असेल, तर नियोजनात किंवा अंमलबजावणीत गंभीर त्रुटी असल्याचा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विकासकामांवर खर्च झालेला प्रत्येक रुपया हा जनतेच्या करातून आलेला असतो. त्यामुळे त्या खर्चाचे परिणाम प्रत्यक्ष दिसणे ही नागरिकांची रास्त अपेक्षा आहे. शहरातील रस्त्यांची अवस्था हा केवळ सोयीचा नव्हे तर सुरक्षिततेचाही प्रश्न आहे. पावसाच्या पाण्याखाली लपलेले खड्डे अनेक अपघातांना कारणीभूत ठरतात. त्यातच पाईपलाईन किंवा सांडपाणी प्रकल्पासाठी खोदलेले रस्ते वेळेत पूर्ववत न केल्यास दुहेरी नुकसान होते. एकीकडे सार्वजनिक निधी खर्च होतो, तर दुसरीकडे नागरिकांना रोजचा त्रास सहन करावा लागतो. विविध विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे हे चित्र दर्शवते. स्वच्छतेचा प्रश्न हा केवळ सौंदर्याचा विषय नाही. तुंबलेले नाले, साचलेले पाणी आणि कचऱ्याचे ढीग हे संसर्गजन्य आजारांना निमंत्रण देतात. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका पावसाळ्यात वाढतो. त्यामुळे स्वच्छता विभागाची कार्यक्षमता, मनुष्यबळ, यंत्रणा आणि देखरेख यांचा गंभीरपणे पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. निवेदनात स्वच्छता निरीक्षकांच्या नियुक्त्यांबाबत करण्यात आलेले आरोपही प्रशासनाने पारदर्शक चौकशीतून स्पष्ट करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा विषय म्हणजे पाणीपुरवठा. कोणत्या दिवशी आणि कोणत्या वेळेला पाणी मिळणार, याचे निश्चित नियोजन नसल्यास नागरिकांची गैरसोय अपरिहार्य ठरते. आधुनिक शहर व्यवस्थापनात माहितीचे नियोजन आणि नागरिकांशी प्रभावी संवाद हे प्रशासनाचे मूलभूत कर्तव्य मानले जाते. लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्षाची भूमिका केवळ टीका करण्यापुरती मर्यादित नसते. जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे, कामांवर प्रश्न उपस्थित करणे आणि उत्तरदायित्वाची मागणी करणे ही त्यांची घटनात्मक जबाबदारी आहे. त्याचवेळी प्रशासनानेही प्रत्येक आरोपाकडे राजकीय चष्म्यातून न पाहता वस्तुनिष्ठपणे पाहणे गरजेचे आहे. आरोप निराधार असतील तर वस्तुस्थिती पुराव्यांसह जनतेसमोर मांडावी आणि त्रुटी असतील तर त्या तातडीने दूर कराव्यात. जालना शहर आज जलनिस्सारण, रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांच्या अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. या प्रश्नांवर केवळ आरोप-प्रत्यारोपांची राजकारणापुरती चर्चा न होता ठोस कृती आराखडा, नियमित आढावा आणि पारदर्शक अंमलबजावणी आवश्यक आहे. नागरिकांना घोषणांपेक्षा परिणाम महत्त्वाचे असतात. पावसाने जालन्याच्या नागरी व्यवस्थेतील उणिवा समोर आणल्या आहेत. आता ही परिस्थिती बदलण्याची जबाबदारी प्रशासन, सत्ताधारी विरोधी पक्ष या सर्वांची आहे. कारण शहराचे राजकारण वेगवेगळे असू शकते; पण शहराच्या समस्या आणि त्यावरील उपाय मात्र सामूहिक जबाबदारीतूनच शक्य आहेत.

# शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!

मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे. मागील दोन तीन दिवसांपासून मुंबईत चालू असलेल्या पावसाने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवली. मागील ४८ तासांत मुंबईत ३८० मिली पाऊस झाला. या पावसाने १२ मुंबईकरांना हिरावून नेले. गेल्या तीन दिवसात मुंबईत १२ जणांना आपला जीव गमवावा लागला. या पावसाने क्षणात होत्याचे नव्हते झाले. दरवर्षीप्रमाणे यावेळीही पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली. पाणी तुंबल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. जागोजागी गुडघाभर पाणी साचले. रस्त्यांवर देखील पाणी साचले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली. महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला. रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. मुंबई पुणे रेल्वे मार्गावर रुळ वाहून गेल्याने या मार्गावरील लांबपल्ल्याच्या गाड्या रद्द कराव्या लागल्या. काही गाड्यांचा मार्ग बदलावा लागला. पावसामुळे काही लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावू लागल्या. लोकलही धीम्या गतीने सोडाव्या लागल्या. लोकांच्या घरात पाणी साचल्याने लोकांचा संसार पाण्याखाली गेला. पावसामुळे शाळा कॉलेजना सुट्टी द्यावी लागली. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. मोठ्या पावसाने मुंबईची दैना का झाली याला जबाबदार कोण ? यावर राजकारण सुरू झाले ; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते ? पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते ? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत. २६ जुलैच्या पावसानंतर शासन, प्रशासन आणि नागरिकांनीही कोणताच धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा. पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनले आहे. मुंबईतील रस्तेही सिमेंटचे आणि पेव्हर ब्लॉकचे बनले आहे त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते. त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक ! राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल. नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. यासोबतच नागरिकांनी वाटेल तिथे कचरा टाकायची सवयही मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे दरवर्षी मुंबईच्या समुद्र पातळीत वाढ होतेय. मुंबई तुंबण्याचे हे ही एक कारण आहे. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते. दोन वर्षापूर्वी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. सहा वर्षापुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पावसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते.

त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची इतिहासातील ती पहिलीच वेळ होती. मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचा देखील अंदाज येत नाही. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो. आता हेच पहा ना जून महिन्यात पाठ फिरवणाऱ्या पावसाने ज्युली महिन्याच्या सुरवातीलाच धुमाकूळ घातला आहे.

अवघ्या दोन दिवसात त्याने दोन महिन्याची सरासरी ओलांडली आहे. जुलै महिन्याचा सुरवातीलाच इतका पाऊस यापूर्वी कधीही झाला नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

---

पान १ व ४ वरुन...

### आषाढी वारीच्या...

तेथेच मुक्काम राहील. दुसऱ्या दिवशी म्हणजे ११ जुलै रोजी जालना येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून दिंडी निघेल. कादराबाद, पाणीवेस मस्तगड,गांधीचमन, शनीमंदिर कचेरी रोड, नूतन वसाहत मार्गे अंबड रोडवरील यशवंतनगर येथील श्री. विठ्ठल रखुमाई मंदिरात प्रवचन होईल. तेथून दहा वाजता निघून लक्ष्मीकांतनगर मार्गे गोलापांगरी येथे नेहरू महाविद्यालयात व्याख्यान होईल. पारेश्वर मंदिर येथे दुपारी विसावा. त्यानंतर सायंकाळी चार वाजता अंबड येथे दिंडी पोहोचेल.

अंबडला तीर्थ विठ्ठल कार्यक्रम

महाराष्ट्रातील अत्यंत सुपरीचीत गाजलेला ''तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल'' हा संगीतमय कार्यक्रम तेथील पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात होणार आहे. शेवगा तालुका अंबड येथील यशवंत प्रतिष्ठानने हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.जालना जिल्ह्यातील सर्व कार्यक्रम तसेच दिंडीत सहभागी व्हावे, असे आवाहन कॉम्रेड अण्णा सावंत, प्रा. नारायणराव बोराडे, प्रा. रावसाहेब ढवळे, ज्ञानदेव पायगव्हाणे, गुलाबराव पाटील यांनी केले आहे.

### जालना मुख्य...

पुन्हा अधोरेखित झाले आहे.

जालना मुख्य टपाल कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी दाखविलेली ही मानवतेची भावना आणि सेवाभाव नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, ''कर्तव्यापलीकडे जाऊन माणुसकी जपणारे पोस्ट कर्मचारी'' अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. मुख्य पोस्ट मास्टर गणेश परिपेल्लि यानी निलेश शिळारकर यांचे अभिनंदन केले

### जालना जिल्हा प्रशासन...

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना नियंत्रण ठेवणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी सांगितले की, जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त प्रयत्नातून ३ हजार शेतकऱ्यांना या उपक्रमाचा थेट लाभ मिळणार आहे. आधुनिक आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचा हा प्रभावी प्रयत्न ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले की, ''देशात खरी नवक्रांती घडवायची असेल तर शेतकऱ्यांच्या प्रति एकर उत्पन्नात वाढ होणे अत्यावश्यक आहे.'' याच ध्येयाने ट्रस्ट गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून, आजपर्यंत ५ हजारांहून अधिक गावे आणि ३४ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत संस्थेचे कार्य पोहोचले आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था () यांनी केलेल्या स्वतंत्र परीक्षणात ट्रस्टच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या उत्पादनात दहापट वाढ झाल्याचे आढळून आले असल्याचा उल्लेख त्यांनी केला. येणाऱ्या काळात हे कार्य अधिक व्यापक स्वरूपात राज्यभर विस्तारण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

कृषीकुल येथे झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीस ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, सनदी अधिकारी आर. रंगमंजू, प्रकल्प संचालक (आत्मा) अमोल आगवाण, उपविभागीय कृषी अधिकारी रामेश्वर रोडगे, जिल्हा रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते, गजानन जंजाळ तसेच ग्लोबल विकास ट्रस्टचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर उपस्थित मान्यवरांनी सिरसाळा येथे भेट देऊन ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात १०८ किलोमीटर नद्यांचे पुनरुज्जीवन, सिरसाळा तलावाचे खोलीकरण आणि विविध जलसंवर्धन उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. या कामांचे कौतुक करत ग्रामीण विकासासाठी शासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून उभारल्या जाणाऱ्या अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### अंतरवाली सराटी...

जलतारा ही संकल्पना नागरिकांसमोर मांडून विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वनराई बंधारे उभारणे, बदलत्या हवामानाचा विचार करून परंपरागत पीकपद्धतीत आवश्यक बदल करणे तसेच गावामध्ये 'जलपंचायत' स्थापन करून लोकसहभागातून जलव्यवस्थापन करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

दौऱ्या दरम्यान जिल्हाधिकारी यांनी गावातील अंतर्गत रस्ते, नाल्या, स्वस्त धान्य दुकान, शाळा आणि अंगणवाडी केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. विविध ठिकाणी आवश्यक सुधारणा करण्याबाबत ग्रामपंचायत पदाधिकारी व संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. शासकीय सुविधा अधिक परिणामकारकपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. विशेष सखोल पुनरीक्षण () अभियानाचाही त्यांनी सविस्तर आढावा घेतला. हे काम निर्धारित कालावधीत गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व बीएलओ पर्यवेक्षक यांच्या कामाचा आढावा घेत एका कुटूंबाचा एन्युमरेशन फॉर्म प्रत्यक्ष भरून घेण्याची प्रक्रिया तपासण्यात आली. यामुळे क्षेत्रीय स्तरावरील कामाची गुणवत्ता व अचूकतेची खात्री करण्यात आली.

जिल्हाधिकारी मित्तल यांनी मौजे सौंदलगाव खुर्द येथे सुमारे वीस वर्षांपासून बंद असलेला आणि समन्वयातून खुला करण्यात आलेला शेतरस्ता प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहिला. या रस्त्यामुळे शेतकऱ्यांची वाहतूक व शेतीकामे सुलभ झाल्याचे सांगत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या मुक्काम दौऱ्यात जलसंवर्धन, ग्रामविकास, नागरिकांच्या समस्या सोडविणे, निवडणूक प्रक्रियेची तयारी आणि स्थानिक पातळीवरील विकासकामांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यावर विशेष भर देण्यात आला. ग्रामस्थांशी थेट संवाद साधून त्यांच्या सहभागातून गावाचा सर्वांगीण विकास साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### यदलापूरच्या शेतकऱ्यांच्या...

तोडगा निघालेला नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांचे निवेदन आणि त्यांची बाजू सविस्तरपणे ऐकल्यानंतर आमदार बबनराव लोणीकर यांनी तत्काळ चे संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. यावेळी त्यांनी यदलापूर येथील संपादित जमिनींच्या मूल्यांकनात झालेल्या तांत्रिक त्रुटींची माहिती देत संपूर्ण प्रकरणाची सखोल तपासणी करण्याची विनंती केली. पात्र शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेऊन आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात तसेच न्याय्य नुकसानभरपाई मिळण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यासोबतच आमदार लोणीकर यांनी परतूरचे उपविभागीय अधिकारी () यांच्याशीही दूरध्वनीवरून चर्चा केली. या प्रकरणावर प्रशासकीय स्तरावर तातडीने कार्यवाही व्हावी, यासाठी उपसभापती संभाजी वारे, यदलापूर गावातील शेतकरी प्रतिनिधी, महसूल विभागाचे अधिकारी आणि चे संबंधित अधिकारी यांची संयुक्त बैठक पुढील दोन ते चार दिवसांत आयोजित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये मूल्यांकन प्रक्रियेशी संबंधित सर्व कागदपत्रे, तांत्रिक बाबी, बाजारमूल्य निश्चितीचे निकष, संपादित क्षेत्राची माहिती तसेच शेतकऱ्यांच्या हरकती यांची सविस्तर छाननी करण्यात येणार आहे. सर्व संबंधित पक्षांची भूमिका ऐकून कायदेशीर चौकटीत सकारात्मक आणि न्याय्य तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

दरम्यान, आमदार लोणीकर यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची नुकसानभरपाई मिळावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करू, अशी ग्वाही दिली. प्रशासनानेही या विषयाकडे संवेदनशीलतेने पाहून कोणत्याही पात्र शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्टपणे सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या घडामोडींमुळे यदलापूर येथील समृद्धी महामार्गग्रस्त शेतकऱ्यांमध्ये न्याय मिळण्याबाबत आशावाद निर्माण झाला असून, प्रस्तावित बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बैठकीत कोणता निर्णय होतो आणि नुकसानभरपाईच्या प्रश्नावर कोणता मार्ग निघतो, याकडे शेतकऱ्यांसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### टेंभुर्णीतील जिर्ण...

निर्णय घ्यावा. ३. पावसाळ्यापूर्वीच ही कारवाई करून नागरिकांच्या जीवाला असलेला धोका टाळावा.

प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडू'' असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. जिल्हा परिषद प्रशासन या गंभीर प्रश्नावर तातडीने निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा देईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सदरील जुन्या पशुसंवर्धन दवाखान्याची इमारत पाडण्यासाठी ग्रामपंचायत च्या वतीने ठराव पारीत करून कळविले याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन संबधीत जिल्हा परिषद बाधकाम विभागाचे अधिकारी यांनी पाहणी करून वरिष्ठांना आवाहल द्यावा

**जगदीश आढाव**
**प्रशासक ग्रा प टेंभुर्णी**

सदर चा जुनी पशुसंवर्धन दवाखाना इमारती मध्ये घाणाच साचलेले आहे यामुळे मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या परिसरातील घाणीच्या सामराज्रा नागरीकांच्या आरोग्यस धोकादायक आहे.

**शौकत भाई बागवान**

### राजस्थानचे महामहिम...

मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. गोविंद भताने यांनी महामहिम राज्यपालांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे सामाजिक कार्याला अधिक बळ मिळेल आणि भविष्यात अधिक जोमाने लोकसेवा करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

राजस्थानचे महामहिम राज्यपाल मा. श्री. हरिभाऊ नाना बागडे यांची ही सदिच्छा भेट जालना जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली. उपस्थितांसाठी हा प्रेरणादायी आणि संस्मरणीय क्षण ठरला.

यावेळी नगरसेवक किशोर पांगारकर, नगरसेवक अमोल ठाकूर, सुरज निकाळजे, अ‍ॅड. श्रीराम हुशे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

### आज मुलांचे मानसिक...

यांनी विद्यार्थ्यांना सोशियल रेझिलिअन्स' (सामाजिक कणखरपणा)** विकसित करण्याचे आवाहन केले. मित्रांच्या कोणत्याही चुकीच्या दबावापुढे ( ) न झुकता अत्यंत ठामपणे 'नाही' () म्हणण्याची हिंमत मुलांनी अंगी बाणवली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, करिअरची निवड करताना केवळ इतरांचे अनुकरण न करता स्वतःची आवड (), बौद्धिक कल () आणि आपले व्यक्तिमत्त्व ओळखूनच ध्येयनिश्चिती करावी, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

कठोर शिस्तीचा तणाव घालवण्यासाठी 'बडी सिस्टीम' व ध्यानाचा वापर:

सैनिकी शाळेत पहाटे उठण्यापासून ते रात्री झोपेपर्यंतचे कडक वेळापत्रक पाळावे लागते, ज्यामुळे कधीकधी विद्यार्थ्यांवर मानसिक ताण निर्माण होतो. हा ताण हलका करण्यासाठी शाळेत नियमित ध्यान (), विपश्यना तंत्र, शारीरिक व्यायाम, संगीत ऐकणे आणि स्वतःचे छंद जोपासणे आवश्यक आहे.

नवीन विद्यार्थ्यांना भावनिक आधार देण्यासाठी शाळेत 'बडी सिस्टीम' ( ) लागू करावी, ज्यामध्ये वरिष्ठ विद्यार्थी नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शकाप्रमाणे मदत करतील. शिक्षक आणि हाऊस मास्टर्सनी केवळ शिस्त लावणारे अधिकारी न राहता विद्यार्थ्यांचे 'मित्र आणि मार्गदर्शक' बनावे. मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत त्यांच्या भावनांना मोकळीक द्यावी. अत्यंत गंभीर प्रसंगी नातेवाईक, समुपदेशक, मानसतज्ज्ञ किंवा तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यास कचरू नये, असेही डॉ. खरात यांनी नमूद केले.

**मान्यवरांची उपस्थिती आणि समारोप:**

''जर आपण किशोरवयीन मुलांचे मानसिक आरोग्य ( –) आज जपले, तरच त्यांचे भविष्य खऱ्या अर्थाने उज्ज्वल ( ) होईल,'' या सकारात्मक आणि विचारप्रवर्तक संदेशाने कार्यशाळेची सांगता झाली. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ सैनिकी शाळेचे प्राचार्य अंकुश खराबे सर लाभले होते. याप्रसंगी प्रा.डी.एल. राक्षे सर, प्रा. भगवान पडुळ, प्रा. गरुड सर यांच्यासह शाळेतील संपूर्ण प्राध्यापक वृंद, हाऊस मास्टर्स आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन ऊर्जा आणि आत्मविश्वास पाहायला मिळाला.

### सिद्धार्थ महाविद्यालयाच्या...

एम. के. पवार, शंकर देवडे, ग्रामस्थ तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती होण्यास हातभार लागला असून महाविद्यालय व ग्रामस्थ यांच्यातील स्नेहसंबंध अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### टेंभुर्णी बस...

नागरिकांनी आणि प्रवासी संघटनांनी शासनाने यात लक्ष घालण्याची मागणी केली आहे. सर्वचजण जबाबदारी झटकत असतील तर अतिक्रमण कधी काढणार, असा सवाल उपस्थित करत शासनाने तातडीने लक्ष घालून टेंभुर्णी बस थांबा अतिक्रमणमुक्त करावा अशी मागणी होत आहे.

# इंग्लिश चॅनेलला गवसणी घालणारी 'जलपरी' गीता मालुसरे आज भारतात

**मुंबई –रवींद्र मालुसरे**

: जागतिक जलतरण क्षेत्रातील अत्यंत अवघड मानली जाणारी इंग्लिश खाडी पोहून पार करण्याचा ऐतिहासिक पराक्रम करणारी कुमारी गीता महेश मालुसरे आज भारतात पुण्यात परत येत आहे. रत्नागिरी येथील सागरी स्पर्धेत पोहत असताना गीताला जेलीफिश या विषारी जलचराचा तीव्र दंश झाला होता. तिचा हात निकामी होण्याचा धोका निर्माण झाला होता. हात वाचवण्यासाठी व वेदनांवर मात करत त्यांना तब्बल ११ शस्त्रक्रिया सहन कराव्या लागल्या होत्या.आपले स्विमिंग करिअर संपले असे वाटत असताना दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गीताने पुन्हा एकदा पाण्यात उतरून हा पराक्रम केला आहे. इंग्लडमध्ये प्रॅक्टीस करताना जेली फीशने पुन्हा एकदा गीताला दंश केला होता. सुदैवाने हा दंश विशारी नव्हता. मात्र इंग्लिश खाडीत पोहत असताना जुन्या जखमांच्या वेदना ठणकत होत्या, जीवघेण्या जेलीफिश दंशाचे मानसिक दडपणही होते, मात्र असह्य वेदनांना विसरून ती फक्त आपल्या ध्येयाकडे पुन्हा झेपावत राहिली.आपले लक्ष फक्त स्वप्नावर केंद्रित केले



आणि अखेर तीने इतिहास रचला. इतका संघर्ष करून मिळवलेले हे यश जगाच्या पाठीवर खरोखरच एकमेवाद्वितीय आहे. गीताने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश जगभरात कौतुकास पात्र ठरले आहे. वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षापासून पोहायला सुरुवात केली होती. वयाच्या १३ व्या वर्षी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा संदेश देण्यासाठी गीताने मुंबईतील प्राँग्ज लाइट हाउस ते गेट वे ऑफ इंडिया ते वाशी खाडी पूल हे समुद्रातील ३१ किलोमीटर अंतर अवघ्या ४ तास ५५ मिनिटांत पोहून पार केले होते. २०२२ मध्ये इस्त्राईलला झालेल्या स्पर्धेत दुसरी आली होती. रत्नागिरी मध्येही ती अपघात होऊनही दुसरी आली होती. इंग्लिश चॅनेल पार करून यापुढे थांबायचे नाही असे गीताने ठरवले आहे. या वर्षी येणाऱ्या ऑगस्टमध्ये न्यूयॉर्कमधील ४६ किलोमीटरची 'ट्वेंटी ब्रिजेस' आणि सप्टेंबरमध्ये कॅलिफोर्नियातील ३२ किलोमीटरची 'कॅटेलिना चॅनेल' पार करण्यासाठी आत्ता सज्ज झाली आहे. गीताला जागतिक कीर्तीचा 'क्वीन ऑफ ओशन' ( ) हा बहुमान मिळवण्याचा आहे. जगातील सात प्रमुख खाड्या पोहायच्या असून, या 'सेव्हन ओशन चॅलेंज' स्वीकारण्यास तीने धडाक्यात सुरुवात केली आहे.

# शेतकऱ्यांनी हवामानाच्या स्थितीनुसार नियोजन करावे
## ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसात घट

**मुंबई - प्रतिनिधी**

जुलैच्या सुरुवातीला मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली असली तरी राज्यातील विविध भागांमध्ये आतापर्यंत सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे, विशेषतः खानदेश (धुळे आणि नंदुरबार जिल्हे), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्हे), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागाचा यामध्ये समावेश आहे. ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्याचा अंदाज असून, ही परिस्थिती किमान पुढील १० दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. या दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे. तसेच, राज्यातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्राथमिक अंदाजानुसार जुलै महिन्याच्या उत्तरार्धात पूर्वार्धाच्या तुलनेत पावसाचे प्रमाण कमी राहू शकते.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीचे नियोजन करावे. राज्यातील ज्या भागांमध्ये अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही, तिथे शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.



जिजामाता द्वार कडून जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था मोठे मोठे खड्डे दिसून येत आहे.

**छायाचित्र किरण खानापुरे**

# हिरो मोटोकॉर्पला सदोष बाईक विकणे पडले महागात; ग्राहकाला १०% घसारा वजा करून रक्कम परत करण्याचे ग्राहक आयोगाचे आदेश

नवीन खरेदी केलेल्या मोटरसायकलमधील वारंवार येणाऱ्या गंभीर त्रुटी दूर करण्यात अयशस्वी ठरल्याने, बंगळूरु अतिरिक्त जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने हिरो मोटोकॉर्प लिमिटेड आणि तिच्या डिलरला सेवेतील त्रुटीसाठी संयुक्तपणे जबाबदार धरले आहे. आयोगाने कंपनीला गाडीची किंमत १०% घसारा वजा करून परत करण्याचे निर्देश दिले आहेत. या निकालामुळे सदोष वाहन विकणाऱ्या कंपन्यांना मोठा धक्का बसला आहे.या प्रकरणात, फिर्यादी श्री. गणेश जे. यांनी १ जुलै २०२४ रोजी हिरो मोटोकॉर्पचे अधिकृत डिलर साई मोटर्स यांच्याकडून हिरो एक्सट्रिम १२५आर ही मोटरसायकल खरेदी केली होती. खरेदीनंतर काही दिवसांतच, गाडी चालत्या रस्त्यावर असताना इंजिन अचानक बंद पडण्याचा गंभीर दोष वारंवार उद्भवू लागला. फिर्यादीने अनेकवेळा डिलरकडे तक्रार करून सर्व्हिस सेंटरला भेटी दिल्या. थ्रॉटल बॉडी, क्लच प्लेट्स, क्लच स्विच, फ्युएल पंप, वायरिंग किट आणि एअर फिल्टर यांसारखे अनेक भाग बदलूनही हा दोष कायम राहिला.फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, सर्व्हिस सेंटरला दहापेक्षा जास्त वेळा भेट देऊन आणि डिलर, हिरो मोटोकॉर्पचे अधिकारी आणि राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन पोर्टलवर तक्रारी करूनही समस्येचे निराकरण झाले नाही. मोटरसायकलच्या या सततच्या बिघाडामुळे आणि तो कायमस्वरूपी दुरुस्त करण्यात कंपनीला आलेल्या अपयशामुळे व्यथित होऊन, फिर्यादीने सेवेत त्रुटी असल्याचा आरोप करत बंगळूरु अतिरिक्त जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे धाव घेतली व गाडीची किंमत, नुकसान भरपाई आणि खटल्याचा खर्च परत मिळण्याची मागणी केली.दुसरीकडे, हिरो मोटोकॉर्प आणि डिलरने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या तांत्रिक टीमने केलेल्या तपासणी आणि चाचणीमध्ये मोटरसायकलमध्ये कोणताही उत्पादन दोष आढळला नाही. त्यांनी असा दावा केला की, केवळ ग्राहकांच्या समाधानासाठी काही भाग बदलण्यात आले होते आणि वॉरंटीच्या अटींनुसार वाहन बदलून देणे किंवा रक्कम परत करणे धोरणात बसत नाही.आयोगाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे निरीक्षण नोंदवले की, मोटरसायकलमध्ये रस्त्यावर चालताना इंजिन बंद पडण्याची समस्या वारंवार उद्भवली होती आणि खरेदीनंतर अल्पावधीतच फिर्यादीने अनेकदा सर्व्हिस सेंटरला भेट दिली होती. आयोगाने नमूद केले की, कंपनीने स्वतः गाडीचे अनेक भाग बदलले होते, हेच गाडीत दोष असल्याचे सिद्ध करते. अनेक जॉब कार्ड तयार करण्यात आले होते आणि चाचणी दरम्यान गाडी बंद पडल्याचे कंपनीने स्वतःच मान्य केले होते, ज्यामुळे फिर्यादीचा दावा अधिक मजबूत झाला. आयोगाने हिरो मोटोकॉर्प आणि डिलरला सेवेत त्रुटीसाठी दोषी ठरवून, मोटरसायकल परत घेतल्यानंतर १०% घसारा वजा करून ८८,८०० रुपये फिर्यादीला परत करण्याचे निर्देश दिले. तसेच, खटल्याच्या खर्चापोटी २,००० रुपये देण्याचे आदेश दिले.या निकालावर भाष्य करताना कायदेतज्ज्ञ ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''ग्राहक संरक्षण कायद्यानुसार, जर एखाद्या उत्पादनात, विशेषतः वाहनामध्ये, वारंवार गंभीर दोष आढळत असेल आणि तो दुरुस्त करण्यात कंपनी अपयशी ठरत असेल, तर ग्राहकाला केवळ दुरुस्तीवर अवलंबून राहण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत, उत्पादनाची किंमत परत मिळवण्याचा ग्राहकाला पूर्ण अधिकार आहे. बंगळूरु ग्राहक आयोगाचा हा निकाल ग्राहक हक्कांचे संरक्षण करणारा असून, सदोष वस्तू विकणाऱ्या कंपन्यांना जबाबदार धरणारा एक महत्त्वाचा आणि स्वागतार्ह निर्णय आहे.''

# मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांबाबत आ.रोहित पवार यांची मुख्यमंत्र्यांसोबत भेट

## रस्ते, पूल आणि न्यायालयासाठी निधीची मागणी

**कर्जत जामखेड – प्रतिनिधी**

कर्जत–जामखेड मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळावी आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी आ. रोहित पवार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानभवनात भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी मतदारसंघाशी संबंधित अनेक विकासकामांबाबत निवेदने सादर करत आवश्यक निधी, प्रशासकीय मंजुरी आणि तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. यामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मतदारसंघातील सात महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली. या रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याने नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच वाहतूकदारांना



मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजुरीसाठी मागणी करण्यात आलेल्या रस्त्यांमध्ये शिंपोरा रोड, दिघी रोड, गुरव पिंपरी ते थिटेवाडी रोड, मिरजगाव ते रातंजन रोड, सावरगाव ते शिउर रस्ता, डोणगाव–भवरवाडी रस्ता आदी महत्त्वाच्या मार्गांचा समावेश असून एकूण २७.५ किलोमीटर अंतराच्या रस्त्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाची मागणी करण्यात आली. यासोबतच, २०२५ मधील अतिवृष्टीत वाहून गेलेल्या शिंपोरा–खेड मार्गावरील नांदणी नदीवरील पुलाच्या कामालाही मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत तातडीने मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्मरणपत्र देण्यात आले. हा पूल वाहून गेल्यापासून शिंपोरा आणि खेड परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आ.रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या भागातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि दळणवळण सुरळीत ठेवण्यासाठी भारतीय लष्कराच्या अभियांत्रिकी विभागामार्फत तात्पुरत्या स्वरूपात उभारण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची विनंतीही आ. रोहित पवार यांनी केली.

याशिवाय, कर्जत आणि जामखेड या दोन्ही तालुक्यांसाठी कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यास मा. उच्च न्यायालयाने मंजुरी दिल्यानंतरही न्यायालय सुरू होण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद प्रलंबित असल्याकडे त्यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. न्यायालयासाठी आवश्यक इमारत व न्यायाधीशांच्या निवासाची तयारी करण्यात आली असून, केवळ निधी उपलब्ध झाल्यास न्यायालय तातडीने सुरू होऊ शकते, असे आ .रोहित पवार यांनी सांगितले. हे न्यायालय सुरू झाल्यास कर्जत आणि जामखेड तालुक्यातील हजारो पक्षकार, वकील आणि सर्वसामान्य नागरिकांची जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गैरसोय दूर होऊन न्यायप्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान होण्यास मदत होणार आहे. मतदारसंघातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने रस्ते, पूल, तात्पुरती वाहतूक व्यवस्था आणि न्यायव्यवस्थेशी संबंधित सर्वच विषयांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी आ. रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असून निधी मंजूर होऊन प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागतील अशा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

# किड्स इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घेऊ नये; गटशिक्षण अधिकाऱ्यांचे अधिकृत पत्र, शाळेला मान्यता नसल्याचा स्पष्ट उल्लेख

## किड्स इंग्लिश स्कूलबाबत शिक्षण विभागाचा इशारा; प्रवेशापूर्वी गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर येथील किड्स इंग्लिश स्कूल संदर्भात गटशिक्षण अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या अधिकृत पत्रामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. सदर पत्रामध्ये किड्स इंग्लिश स्कूलला मान्यता नसल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले असून, ''या शाळेत प्रवेश घेऊ नये'' अशा स्पष्ट सूचना पालकांना देण्यात आल्या आहेत. तसेच, प्रवेशाबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. गटशिक्षण अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, संबंधित शाळेला आवश्यक शासकीय मान्यता नसल्याने विद्यार्थ्यांचा प्रवेश घेऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि पालकांची दिशाभूल टाळण्यासाठी हा इशारा देण्यात आल्याचे पत्रातून स्पष्ट होते. या पत्रानंतर संबंधित शाळेसमोर ''किड्स इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घेऊ नये'' असा फलकही लावण्यात आला आहे. त्यामुळे पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक जण शिक्षण विभागाकडून अधिकृत माहिती घेत असल्याचे समजते. शिक्षण विभागाने पालकांना कोणत्याही शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी त्या शाळेची शासनमान्यता तपासूनच प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः किड्स इंग्लिश स्कूल संदर्भात जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्राची दखल घेऊनच पुढील निर्णय घ्यावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

## वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ तातडीने कार्यान्वित करा

# जालना जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे आ. अर्जुनराव खोतकर यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

राज्यात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ तातडीने कार्यान्वित करावे, या प्रमुख मागणीसाठी जालना जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने आमदार अर्जुनराव खोतकर यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार खोतकर यांचा सत्कार करून वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विधानसभेत हा विषय प्रभावीपणे मांडण्याची विनंती केली.



संघटनेचे अध्यक्ष रामेश्वर लहामगे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आमदार खोतकर यांची भेट घेतली. यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या व्यवसायासमोरील वाढत्या अडचणी, आर्थिक असुरक्षितता, अपघात संरक्षण, आरोग्य सुविधा, निवृत्तीनंतरची सुरक्षितता तसेच सामाजिक कल्याणाच्या योजनांचा अभाव याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संघटनेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात राज्य शासनाने जाहीर केलेले वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ अद्याप प्रभावीपणे कार्यान्वित झाले नसल्यामुळे हजारो वृत्तपत्र विक्रेते विविध शासकीय लाभांपासून वंचित राहत असल्याचे नमूद करण्यात आले. त्यामुळे महामंडळ तातडीने सुरू करून त्यामार्फत वृत्तपत्र विक्रेत्यांना आर्थिक, सामाजिक व वैद्यकीय संरक्षण उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष रामेश्वर लहामगे यांनी सांगितले की, पहाटेपासून कोणत्याही परिस्थितीत नागरिकांपर्यंत वृत्तपत्र पोहोचविणारे विक्रेते लोकशाहीच्या माहिती साखळीतील महत्त्वाचा घटक आहेत. मात्र, त्यांच्या प्रश्नांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नाही. वृत्तपत्र विक्रेत्यांना हक्काचा आधार, संरक्षण आणि सन्मान मिळावा, यासाठी कल्याणकारी महामंडळ प्रभावीपणे कार्यान्वित होणे अत्यंत आवश्यक आहे. या माध्यमातून विक्रेत्यांच्या विविध समस्या शासनापर्यंत पोहोचविण्यास आणि त्यांचे निराकरण करण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेतले. वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मागण्या रास्त असून त्या शासनाच्या संबंधित स्तरावर तसेच विधानसभेत मांडण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी सकारात्मक भूमिका त्यांनी व्यक्त केल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष उमेश भदनेकर, सचिव संतोष लहाने, जिल्हा संघटक गणेश वाळेकर, कोषाध्यक्ष शिवराम भवर, सहसचिव गणेश गव्हाणे, मार्गदर्शक शंकरसिंग ठाकूर, रामेश्वर आप्पा सतकर, दीपक मधारे, मोहम्मद इर्शाद, अर्जुन डोळझाके यांच्यासह जिल्ह्यातील अनेक वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते.

# जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त कौशल्य सप्ताहाचे आयोजन

**जालना – प्रतिनिधी**

जागतिक युवा कौशल्य दिन १५ जुलै निमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, जालना यांच्या वतीने दि. ७ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत सामायिक भविष्यासाठी कौशल्य या संकल्पनेवर आधारित कौशल्य सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहामध्ये युवक–युवती, विद्यार्थी, महिला तसेच उद्योजकांसाठी विविध स्पर्धा, कार्यशाळा, सन्मान सोहळे, वृक्षारोपण, सामंजस्य करार आणि रोजगार मेळावा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे वेळापत्रक : कौशल्य सप्ताहाची सुरुवात दि.७ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत आयोजित रांगोळी स्पर्धेने होणार आहे. दि.८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षणार्थी नियुक्तीपत्र वाटप करण्यात येईल, तर दुपारी १२.०० वाजता उत्कृष्ट उद्योजक, कौशल्य प्रशिक्षण संस्था तसेच मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना नियोक्ता यांचा सन्मान करण्यात येणार आहे. दि. ९ जुलै२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता पोलीस परेड ग्राउंड, बॅडमिंटन हॉल, जालना येथे सुरक्षा मंत्र– आधुनिक जगात एक पाऊल पुढे या विषयावर इयत्ता पाचवी व त्यापुढील विद्यार्थीनी तसेच महिलांसाठी महिला स्वसंरक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. दि. १० जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता पारशी टेकडी, जालना येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून, त्यानंतर दुपारी १२.०० बदनापूर येथील कॉलेज ऑफ फार्मसी येथे कौशल्य विकास काळाची गरज या विषयावर वक्तृत्व स्पर्धा होणार आहे.

दि. १३ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता कौशल्य विकास विभागाच्या योजना व उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी नामांकित महाविद्यालयांसोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे. दि. १४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थी यशस्वी उद्योजक व उद्योजिकांचा सन्मान करण्यात येईल.

कौशल्य सप्ताहाचा समारोप दि. १५ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता पोलीस परेड ग्राउंड, बॅडमिंटन हॉल, जालना येथे आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याने होणार आहे. या कौशल्य सप्ताहातील विविध स्पर्धा व उपक्रमांमध्ये सर्व इच्छुक युवक–युवती, विद्यार्थी, महिला आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जालना येथे संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक ०२४८२–२९९०३३ तसेच ई–मेल jalnarojgar@gmail.com वरही माहिती उपलब्ध आहे. असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, गणेश चिमणकर, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# टेंभुर्णीतील जिर्ण पशुसंवर्धन दवाखान्याच्या खोल्यांमुळे गावकऱ्यांच्या आरोग्याला धोका!

## मोडकळीस आलेल्या इमारतीत घाणीचे साम्राज्य; जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने पाडण्याची परवानगी द्यावी, ग्रामस्थांची मागणी

**दत्ता देशमुख**

जालना जिल्ह्यातील टेंभुर्णी गावातील *जिर्ण झालेल्या पशुसंवर्धन दवाखान्याच्या खोल्यांमुळे* संपूर्ण गावकऱ्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असलेल्या या इमारतीत *घाण, कचरा साचला असून साप, विंचू व डासांचे प्रजनन केंद्र* बनले आहे. ही इमारत कधीही कोसळून दुर्घटना होऊ शकते, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णीला इमारत पाडण्याची परवानगी देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने लक्ष घालावे,* अशी मागणी नागरिक करत आहेत.सदर जुन्या पशुसंवर्धन दवाखान्या शेजारी पोलीस स्टेशन बस थांबा सार्वजनिक वाचनालय दुसऱ्या बाजूने लोकवस्ती यामुळे अगदी मोक्याच्या ठिकाणी घाणीचे सामराज्र पसरले आहे यामुळे टेंभुर्णी शहराच्या अगदी नाकावर असलेल्या या पशुसंवर्धन विकास दवाखाना जुन्या इमारतीच्या परिसरात खोल्या मध्ये नागरिक लघूशंका संडास शेजारच्या महिला घाण आणून टाकत असल्याने सर्वाधिक दुर्गंधी निर्माण झाली आहे

जिर्ण व धोकादायक इमारत :* पशुसंवर्धन विभागाचा जुना दवाखाना गेल्या अनेक वर्षांपासून बंद आहे. *भिंतींना तडे गेले असून छताचा काही भाग कोसळला आहे.*



कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडू शकते.

२. *आरोग्याला धोका :* बंद खोल्यांमध्ये *कचरा व साचलेल्या पाण्यामुळे डासांचा प्रचंड प्रादुर्भाव* झाला आहे. यामुळे मलेरिया, डेंग्यू सारखे आजार पसरण्याची भीती आहे. तसेच *साप, विंचू व इतर विषारी प्राणी* येथे आढळून येतात.

३. *असामाजिक कृत्यांचे अड्डा :* दुरवस्था झाल्यामुळे या ठिकाणी *दारू पिणे, जुगार व इतर असामाजिक कृत्ये* सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. शाळकरी मुले या भागातून जाताना घाबरतात.

४. *परवानगीचा अडसर :* ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णीने ही *धोकादायक इमारत तातडीने पाडण्याचा ठराव* केला आहे. मात्र, ही जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची असल्याने *जि.प. कडून पाडण्याची लेखी परवानगी* मिळणे आवश्यक आहे. ती अद्याप मिळालेली नाही.

**ग्रामस्थांचा संताप**

एका ग्रामस्थाने सांगितले, _''ही इमारत गावाच्या मध्यभागी आहे. *आमच्या लहान मुलांच्या जिवाला धोका आहे.* प्रशासन फक्त पत्रव्यवहारात वेळ घालवत आहे. पावसात ही इमारत पडली तर जबाबदार कोण?'_

**तातडीची मागणी**

या पार्श्वभूमीवर टेंभुर्णीतील नागरिक व ग्रामपंचायत सदस्यांनी *जिल्हा परिषद जालना, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णाकांत कनवारिया* यांना विनंती केली आहे की,

१. तातडीने पाहणी करून ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णीला जिर्ण इमारत पाडण्याची परवानगी द्यावी.

२. पाडल्यानंतर त्या जागेचा *सार्वजनिक आरोग्यासाठी किंवा सामुदायिक कामासाठी* वापर करण्याबत *(पान २ वर)*

## अखिल भारतीय लोकहित महासंघाच्या जालना जिल्हा सहसचिवपदी शफीक शेख तर जालना शहर सोशल मिडीया प्रमुखपदी सय्यद मोईन यांची नियुक्ती

**जालना – प्रतिनीधी**

लोकांच्या हितासाठी सदैव तत्पर असणाऱ्या अखिल भारतीय लोकहित महासंघाच्या जालना जिल्हा सहसचिवपदी लक्कडकोट येथील समाजसेवक शफ ीक शेख मुनीर शेख यांची तर जालना शहर सोशल मिडीया प्रमखपदी नुतन वसाहत येथील सय्यद मोईन सय्यद निसार यांची नियुक्ती नुकतीच महासंघाचे अध्यक्ष शेख चाँद पी. जे. यांच्या हस्ते करण्यात आलेली आहे, यावेळी महासंघाचे जालना शहर सहसचिव ईम्रान खान यांची विशेष उपस्थिती होती.



समाजातील तळागळातील वंचीत, वृद्ध, युवक, महिला, विद्यार्थी, कामगार या सर्वाच्या हितासाठी सर्वातपरी प्रयत्न करावे असे आवाहन नियुक्ती पत्रामध्ये करण्यात आलेले आहे.

सदर नियुक्ती बद्दल शफीक शेख व सय्यद मोईन यांचे महासंघाचे कार्याध्यक्ष वसीम खान, जिल्हाध्यक्ष प्रदिप दिव्यवीर तसेच सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिलेल्या आहेत.

## राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे यांची डॉ. गोविंद भताने यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

### डॉ. भतानेस छाया फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक

**जालना | प्रतिनिधी**

राजस्थानचे महामहिम राज्यपाल मा. श्री. हरिभाऊ नाना बागडे यांनी जालना येथील युवा समाजसेवक तथा डॉ. भतानेस छाया फाउंडेशनचे संस्थापक व संचालक डॉ. गोविंद भताने यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन कुटुंबीयांशी आत्मीय संवाद साधला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, युवक विकास आणि राष्ट्रनिर्माणाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. सदिच्छा, आत्मीयता आणि प्रेरणादायी संवादामुळे ही भेट अविस्मरणीय ठरली.

महामहिम राज्यपालांच्या आगमनावेळी डॉ. गोविंद भताने, त्यांच्या पत्नी डॉ. अभिसारिका भताने, आई श्रीमती छाया भताने, वडील श्री. नागनाथ भताने, भाऊ ॲड. महेश भताने, सौ. सोनाली भताने तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. संवादादरम्यान मा. श्री. हरिभाऊ नाना बागडे यांनी युवकांनी समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना जोपासत आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक समता, जनजागृती आणि राष्ट्रहिताच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. राष्ट्राच्या प्रगतीमध्ये तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून समाजहितासाठी कार्य करणारे युवकच सक्षम आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व घडवू शकतात, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. गोविंद भताने यांनी डॉ. भतानेस छाया फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आरोग्य जनजागृती मोहिमा, मोफत दंत व आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, पर्यावरण संवर्धन उपक्रम, युवक सक्षमीकरण, क्षयरोगमुक्त भारत अभियानातील सहभाग तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. फाउंडेशनच्या कार्याची दखल घेत महामहिम राज्यपालांनी या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या तरुणांना शासन व समाजाने प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. भविष्यातही अधिक व्यापक प्रमाणात समाजोपयोगी कार्य करण्यासाठी त्यांनी शुभेच्छा देत फाउंडेशनला पाठिंबा व्यक्त केला.

महामहिम राज्यपालांनी कुटुंबीयांशीही आत्मीय संवाद साधत भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था, मूल्याधिष्ठित जीवन आणि समाजसेवेच्या परंपरेविषयी *(पान २ वर)*

## आज मुलांचे मानसिक आरोग्य जपले, तरच देशाचे भविष्य उज्ज्वल होईल' – डॉ. गजानन खरात यांचे प्रतिपादन

**जालना – प्रतिनिधी**

आठवी ते बारावी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील शारीरिक, मानसिक आणि भावनिक स्थित्यंतराचा अत्यंत संवेदनशील टप्पा असतो. त्यातच घरच्या मायेच्या वातावरणातून थेट निवासी सैनिकी शाळेसारख्या कठोर शिस्तीच्या आणि कडक वेळापत्रकाच्या वातावरणात राहताना विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने द्विगुणित होतात. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांमधील मानसिक व भावनिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि त्यांच्यात सकारात्मकता रुजवण्यासाठी जालना येथील *पार्थ सैनिकी शाळेत 'मानसिक स्वास्थ्य आणि ताण-तणाव व्यवस्थापन'* या विषयावर एका विशेष प्रबोधनात्मक कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रसिद्ध क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आणि करिअर समुपदेशक *डॉ. गजानन खरात* यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि हाऊस मास्टर्स यांच्याशी अत्यंत अभ्यासपूर्ण व थेट संवाद साधला.



या कार्यशाळेला शाळेतील जवळपास ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

'होम सिकनेस' आणि भावनिक बदल स्वाभाविक: पालकांनी व शिक्षकांनी खंबीर राहावे

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. गजानन खरात म्हणाले की, नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना घरापासून दूर राहिल्यामुळे 'होम सिकनेस' (घराची ओढ किंवा उदास वाटणे) होणे अतिशय नैसर्गिक आहे. मात्र, हा त्रास तात्पुरता असतो. साधारणपणे ३ ते ६ आठवड्यांत मुले या नवीन वातावरणाशी स्वतःला जुळवून घेतात. किशोरवयीन मुलांमध्ये होणाऱ्या संप्रेरकांच्या () बदलांमुळे अचानक राग येणे, चिडचिड होणे किंवा एकाकी वाटणे अशा भावनांच्या लाटा येतात.

यावर उपाय सांगताना ते म्हणाले की, घरची आठवण कमी करण्यासाठी मुलांनी मित्रांचे गट बनवून गप्पा माराव्यात, मैदानी खेळांमध्ये सहभाग घ्यावा आणि आपल्या भावना शिक्षकांकडे मोकळेपणाने व्यक्त कराव्यात.

'सोशियल रेझिलिअन्स' आणि करिअरची योग्य निवड:

आजच्या सोशल मीडिया आणि स्पर्धेच्या युगात मुलांवर समवयस्कांचा मोठा प्रभाव असतो. डॉ. खरात *(पान २ वर)*

## प्रा योगेश लहामटे यांची वस्तीगृह प्रमुखपदी नियुक्ती

**जालना - प्रा डॉ राजेंद्र सोनवणे**



जे ई एस महाविद्यालय जालना च्या वस्तीगृह प्रमुख पदी प्रा. योगेश लहामटे यांची नियुक्ती करण्यात आली असून,त्याबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री व उपप्राचार्य डॉ.उमेश मोगले, उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड, प्रा. यशवंत सोनूने,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ राजेंद्र सोनवणे, डॉ राजेश सरकटे, प्रा. सुनील इंदुरकर आदींनी अभिनंदन केले आहे.

## सिद्धार्थ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रेपाळा येथे वृक्षारोपण कार्यक्रम

**दत्ता देशमुख**

सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफ्राबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मौजे रेपाळा, ता. जाफ्राबाद येथे दि. ७ जुलै २०२६ रोजी वन महोत्सव उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुलजी म्हस्के व महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. सविता सिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.





पर्यावरण संवर्धन, जैव-विविधतेचे संरक्षण आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली. या उपक्रमात ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे यांनी वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाची गरज तसेच भावी पिढ्यांसाठी हरित वारसा जपण्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास रेपाळा गावचे सरपंच गणेश शेळके, उपसरपंच दिलीप देव्हडे, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. कैलास पाटील, प्रा. डॉ. शरद मोहरीर,महाविद्यालयातील प्रसिद्ध प्रमुख प्रा.अनिल वैद्य, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शिवाजी जगतवाड, प्रा. डॉ. प्रदीप मिसाळ, प्रा. सौ. सरिता मनियार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक किरण तिडके व श्रीकांत कारले, शिपाई अंकुश राठोड *(पान २ वर)*

### २०१७ ते २०२६ मधील सरसकट कर्जमाफीची मागणी

## अभ्यास समितीला निवेदन; जाचक अटींमुळे शेतकरी वंचित असल्याचा आरोप

**दत्ता देशमुख**

राज्यातील कर्जमाफी योजनेतील तांत्रिक अडचणींमुळे लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप करत अँग्रो इंडिया गट शेती संघाचे गटसमन्वयक भावराव हरीभाऊ आटपाळे यांनी कर्जमाफी अभ्यास समितीचे अध्यक्ष प्रवीण परदेशी यांना निवेदन दिले आहे. सध्याची कर्जमाफी अभ्यास समिती ही शेतकऱ्यांना न्याय देणारी नसून प्रत्यक्षात चाळणी समिती म्हणून काम करत असल्याचे या निवेदनात म्हटले आहे. महात्मा जोतीबा फुले कर्जमाफी २०१९ आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी २०२६ या दोन्ही योजनांमध्ये बँकांच्या प्रक्रियेमुळे अनेक शेतकरी लाभातून बाहेर पडत आहेत. यामुळे १ एप्रिल २०१९ ऐवजी १ ऑक्टोबर २०१७ ते ३० मार्च २०२६ अशी शासन निर्णयात दुरुस्ती करावी आणि १ ऑक्टोबर २०१७ पासून सरसकट कर्जमाफी लागू करावी, अशी प्रमुख मागणी आटपाळे यांनी केली आहे. २०१९ च्या योजनेत ३० सप्टेंबर २०१८ पर्यंतच्याच थकीत कर्जाची नावे बँकांनी पाठवली. त्यामुळे १ ऑक्टोबर २०१८ ते ३० मार्च २०१९ या कालावधीतील शेतकरी वगळले गेले. सध्याच्या योजनेतही १८ महिन्यांतील शेतकरी लाभापासून दूर राहणार असून, एकूण ३६ महिन्यांतील कर्जदार शेतकरी योजनेबाहेर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमदार रोहित पवार यांनी ७० टक्के शेतकरी वंचित राहत असल्याचा केलेला दावा वस्तुस्थितीला धरून असल्याचेही निवेदनात नमूद आहे.फसवणूक दोन्ही कर्जमाफी योजनांमध्ये हातचलाखी करून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप आटपाळे यांनी केला. हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री आणि कृषी मंत्री यांना ईमेलद्वारे पाठवण्यात आले असून, याची प्रत आमदार रोहित पवार, बच्चू कडू, अंबादास दानवे आणि मनोज जरांगे यांना देण्यात आली आहे. सरकारने याची तातडीने दखल घ्यावी, असे आटपाळे यांनी म्हटले आहे.

# टेंभुर्णी बस थांब्यावरील अतिक्रमणावरून अधिकाऱ्यांची टोलवाटोलवी

## सा.बा. विभाग आणि ग्रामपंचायतीकडून जबाबदारी झटकण्याचे प्रकार, अपघाताचा धोका वाढल्याने नागरिक त्रस्त

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णीतील मुख्य हायवे रोडच्या शेजारी असलेल्या दुकानदारांनी बस थांब्यावर केलेल्या अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मात्र या अतिक्रमणाची जबाबदारी घेण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तयार नाहीत.

या संदर्भात विचारणा केली असता सा.बा. विभागाचे अभियंता शाम कबरे यांनी थेट जबाबदारी झटकली. हा रोड जागतिक बँकेच्या निधीतून करण्यात आला आहे, त्यामुळे अतिक्रमण काढण्याची जबाबदारी देखील जागतिक बँकेचीच आहे, असे ते म्हणाले. रोड त्यांनी केला, त्यांनीच अतिक्रमण काढावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दुसरीकडे हायवे रोड लगतचे अतिक्रमण हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारात येते, असे स्थानिक ग्रामपंचायत अधिकारी सांगतात. सा.बा. अधिकारी थेट जागतिक बँकेचे नाव पुढे करून हात वर करत असल्याने दोन्ही यंत्रणांमधील ढकलाढकलीत नागरिक भरडले जात आहेत.

हायवे लगतच्या बस थांब्यावर दुकाने, हातगाड्या आणि पत्र्याचे शेड उभारल्याने प्रवाशांना बसची वाट पाहण्यासाठी जागा शिल्लक राहिली नाही. गाळेधारकांनी आणि घर मालकांनी भाड्याने दिलेल्या



गाळ्याच्या समोर तब्बल २० फुटांचे पत्र्याचे शेड तयार केले आहेत. रोडच्या अगदी कडेला भाडेकरू व्यावसायिकांनी दुकाने थाटल्याने दुचाकी, चारचाकी गाड्या हायवेवरच उभ्या राहत आहेत. यामुळे बस चालकांना आणि खाजगी वाहनचालकांना मोठी समस्या निर्माण झाली असून प्रशासन याकडे डोळेझाक करत आहे. रोडवरील अपघात वाढत असल्याने शाळकरी मुले आणि वयोवृद्ध महिला प्रवाशांना बसची वाट पाहताना जीव मुठीत घेऊन उभे राहावे लागत आहे. तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

रस्त्याची निर्मिती कोणीही केली असली तरी त्यावरील अतिक्रमण हटवण्याची जबाबदारी ही शासन आणि स्थानिक प्रशासनाची असल्याचे सांगत *(पान २ वर)*

### अतिक्रमण काढण्यासाठी पुढाकार घ्यावा

''मेन जाफ्राबाद ते जालना हायवे रोडवर अतिक्रमण झाल्याने संभाव्य आपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून सा.बा. विभाग व ग्रामपंचायत कार्यालयात निवेदन दिले परंतु दुर्लक्ष होत आहे यामुळे दाद कोणाकडे मागवावी अशी पंचाईत झाली संबंधित अधिकारी यांनी याकडे लक्ष वेधून अतिक्रमण तात्काळ काढण्यासाठी पुढाकार घ्यावा''

अनेक – नागरिक,, प्रवासी, शाळेतील मुले

_सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जबाबदारी निश्चित करून तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा देखील नागरिकांनी दिला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.